चाळीसगाव

# बहुजनांनी गुढीपाडवा साजरा करू नये

एखाद्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाला नामोहरम करण्याकरिता फारशी उठाठेव न करता वापरण्यात येणारे शस्त्र म्हणजे चारित्र्यहनन ! विरोधकांकडे फारसे प्रभावी मुद्दे नसले की ते आपल्या शत्रूला याच शस्त्राने गारद करीत असतात. प्राचीन काळापासून आपल्या प्रतिपक्षाला बदनाम करण्याकरिता कर्तृत्वशून्य लोकांनी या शस्त्राचा नेहमी वापर केलेला आहे. असाच चारित्र्यहननाचा वापर ब्राह्मण मंडळींनी युवराज छत्रपती संभाजी महाराजांबद्दलही केला. बदफैली, व्यसनी असे अनेक प्रकारचे आरोप करून छ. संभाजी राजे यांना इतिहासात खलपुरुष ठरविण्याचा प्रयत्न मल्हार रामराव चिटणीस या बखरकाराने व आजच्या ब्राह्मण लेखक मंडळींनी सातत्याने पेशवाईपासून ते आजपर्यंत प्रयत्न चालूच आहे.

वास्तविक छ. संभाजी राजांनी वयाच्या १४ व्या वर्षी 'बुधभूषण' संस्कृत ग्रंथ लिहिला. संभाजी राजे इतक्या लहान वयात ग्रंथांचे लिखाण करणारे जगातील एकमेव लेखक आहेत. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी १६ व्या वर्षी लिहिली. तीही भाषांतर करून. छ. संभाजी राजांनी ८ वर्षांत १३० लढाया केल्या. तर पेशव्यांचा पहिल्या बाजीरावाने २० वर्षांत १८ लढाया केल्या. त्याकाही बहुपत्नीरिवाज असूनही छ. संभाजी एकपत्नी, एकवचनी होते तर जेवणावळीत व शृंगारसजात पेशवाईचा निम्मा वेळ गेला आणि त्यातच पेशवाई बुडाली.

स्वतःच्या पूर्वजांनी सहजपणे बुडवलेल्या पेशवाईचा कलंक मिटविण्यासाठी, झाकण्यासाठी ब्राह्मण लेखकांनी मराठ्यांच्या इतिहासाचे विकृतीकरण करण्याचा उद्योग सुरू केला. हिंदुंच्या प्रत्येक सणवारामागे ब्राह्मणी षड्यंत्र असून बहुजन समाजाला ब्राह्मणांनी खोटा इतिहास व भाकडकथा सांगून अंधारात ठेवले. अनेक सणांपैकी गुढीपाडवा हा एक सण. या सणाचे महत्त्व सांगताना असे सांगण्यात येते की, हा मराठी वर्ष तिथीप्रमाणे वर्षाचा पहिला शुभ दिवस. साडेतीन मुहूर्तांपैकी एक चांगला मुहूर्त. पण खरी वास्तविकता अशी आहे की, या दिवसाचे महत्त्व ब्राह्मण लोक देशद्रोह मानून आनंदोत्सव साजरा यासाठी करतात की, या दिवशी छत्रपती संभाजी महाराजांचा ब्राह्मणांनी खून केला होता आणि त्यांचे शिर (डोके) बांबूला लटकावून ते गावभर फिरविले होते, हे एक महत्त्वाचे कारण. दुसरे कारण याच दिवशी आर.एस.एस. ही ब्राह्मणांची संघटना, या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. हेडगेवार यांचा जन्मदिवस म्हणून सर्व ब्राह्मण हा दिवस शुभ मानतात. हे या मागील षड्यंत्र आहे.

छ. संभाजी महाराजांचा खून - छ. संभाजी महाराज संस्कृत ज्ञानी होते. त्यांनी वयाच्या १४ व्या वर्षी 'बुधभूषणम' नावाचा धर्म, न्याय, नीती, राजकारण, युद्ध, परकीय धोरण इत्यादी विषयांचे विश्लेषण करणारा संस्कृत भाषेत धर्मग्रंथ लिहिला होता. तर तीन हिंदी ग्रंथ नखशिख, नायिकाभेद, सातसतक लिहिले होते. पुरोहित, मंत्री, धर्मपंडित यांच्याबरोबर संभाजी राजे वेद संस्कृतमधून चर्चा करत. शिवराज्याभिषेकाच्या राजांनी धर्म क्षेत्रातील चर्चा करून त्यांना पराजित केले होते. पुढे संभाजी राजे छत्रपती झाल्यावर त्यांनी बेईमान व षड्यंत्र रचणाऱ्या ब्राह्मण मंत्र्यांना स्वराज्यद्रोह केल्याबद्दल मृत्यूची शिक्षा केली होती. ब्राह्मण हत्या पाप नाही, हे राज्यकर्त्या राजानेच कृतीतून दाखविले त्यामुळे सर्व ब्राह्मण एक झाले व औरंगजेब सैन्याशी हात मिळवणी करून संभाजी महाराजांना पकडून दिले. रामदास स्वामींचा शिष्य रंगनाथ व तिनशे रामदासी यांनी छ. संभाजी महाराजांना संगमेश्वर मुक्कामी असताना पकडून दिले. औरंगजेब हा धर्माच्या न्यायप्रमाणे राज्य करणारा बादशहा होता. छ. संभाजी महाराज धर्माने हिंदू असल्यामुळे त्यांना शिक्षा देण्याचा अधिकार हिंदू धर्मपंडितांना होता. औरंगजेबाच्या दरबारात सत्ता जरी मुस्लीमांची असली तरी

> **'हिंदू धर्मांच्या प्रत्येक सणवारामागे काहीतरी धार्मिक परंपरा किंवा उद्देश असतो. म्हणून सणवार साजरे केले जातात अशी सर्वसामान्यांची कल्पना किंवा विश्वास आहे. परंतु या सणवारांच्या मागील कारणांची, उद्देशाची विचार मीमांसा, सखोल अभ्यास केला तर असे दिसून येईल की, प्रत्येक सणवारामागे एक ब्राह्मणी षड्यंत्र असून प्रत्येक सणवार बहुजनांच्या अपमानाचा दिवस आहे. अनेक सणवारांपैकी 'गुढीपाडवा' या सणामागील खरा उद्देश काय आहे? छ. संभाजी महाराजांचा या दिवशी कसा छळ ब्राह्मणांनी केला त्याचा हा वृत्तांत.'**

मंत्री ब्राह्मणच होते. औरंगजेबाकडे संभाजी राजे चाळीस दिवस सुरक्षित होते आणि संभाजी राजांबद्दलच्या सुटकेच्या वाटाघाटी सुरू होत्या. अखेर संभाजी राजांना औरंगजेब सोडण्यास तयारही होता. परंतु औरंगजेबाचे ब्राह्मण वकील व चाकरीतील बहुसंख्य ब्राह्मणांच्या आग्रहामुळे संभाजी राजांची मनुस्मृती आचार संहितेनुसार हत्या केली. म्हणजे संभाजी राजांनी संस्कृत वाचल्याने त्यांची जीभ कापण्यात आली. त्यांनी संस्कृत ऐकल्यामुळे त्यांच्या कानात तप्त शिसे ओतण्यात आले. शरीर छिन्न विछिन्न करून त्यांना मारण्यात आले. संभाजी राजांचे शिर उंच बांबूवर लटकवून तुळापूर, वढू, आपटी या परिसरात ब्राह्मणांनी मिरवले व दहशत निर्माण केली की राजा जरी संस्कृत शिकला तरी त्याची हत्या केली जाते. छ. संभाजी महाराजांचा खून केल्यानंतर तिथीप्रमाणे ब्राह्मणांनी आनंदोत्सव म्हणून दुसऱ्या दिवशी गुढ्या उभारल्या. बहुजनांचे राज्य पालथे घातले म्हणून पालथा तांब्या बहुजनांच्या स्त्रियांची विटंबना करणारे प्रतिक म्हणजे साडी चोळी व त्याला बांबू खुपसून घरावर टांगण्याची प्रथा ब्राह्मणांनी सुरू केली. त्यामुळे गुढीपाडवा हा बहुजनांच्या अपमानाचा व ब्राह्मणांच्या स्वाभिमानाचा दिवस आहे. तरी तमाम बहुजनांनी गुढी पाडव्याच्या दिवशी गुढी उभारू नये. गुढी न उभारल्याने तरी छ. संभाजी राजांना बहुजन समाजातर्फे खरी श्रद्धांजली ठरेल. ००